REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २ आगस्ट, १९५० अंक ३१

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

आधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —


हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड
भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.


## विविध माहिती

**हातमागाचे कारखाने बंद होणार**— नवसारी येथील हातमागाचे आणि यांत्रिक मागाचे २० कारखाने सुताच्या पुरवठ्याच्या अभावीं लवकरच बंद पडणार आहेत असें समजतें. कारखाने बंद झाले तर १,००० कामगार बेकार होतील.

**पाकिस्तानच्या रुपयाचें अवमूल्यन होणार—?** पाकिस्तानच्या रुपयाचें अवमूल्यन करण्यांत येणार असल्याच्या बातम्या स्कॉटलंडमधील डंडी येथील बाजारांतून येत आहेत. पाकिस्तानचे अधिकारी मात्र ह्या वृत्ताचा इन्कार करीत आहेत. पाकिस्तानच्या तागाला येणाऱ्या मागण्या ह्या बातम्यामुळें मंदावल्या आहेत असें समजतें. अवमूल्यन झालें तर तें भारतीय रुपयाइतकेंच होईल असें म्हणतात.

**खंडसारी साखरेच्या किंमतीचें नियंत्रण उठलें**— मुंबई सरकारनें राज्यांतील खंडसारी साखरेवरील किंमतीबाबतचें नियंत्रण रद्द केलें आहे. खंडसारी साखर करण्यास मुंबई राज्यांत बंदी आहे. ती साखर उत्तर प्रदेशांतच मोठ्या प्रमाणावर तयार होते. खुद्द उत्तर प्रदेशांत ह्या साखरेवरील नियंत्रण रद्द करण्यांत आल्यामुळें मुंबई सरकारनें ही वरील मार्ग अनुसरला आहे.

**थोड्या खर्चात रंगीत चित्रपट**—हुबळी येथील रहिवासी डॉ. पी. बी. भागवत ह्यांनीं काळ्या—पांढऱ्या रंगांत चित्रें घेतलेले चित्रपट रंगीत करण्याचा शोध लावला आहे. ह्या शोधासाठीं ते वीस वर्षे प्रयत्न करीत होते. ह्या शोधामुळें इंद्रधनुष्यांतील सात रंगांपैकीं कोणताही रंग मूळच्या फिलमवर देतां येईल असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या शोधाचा उपयोग करण्याचा खर्च फार थोडा असल्यानें भारतीय चित्रपटनिर्मात्यांना तो परवडण्यासारखा आहे असेंही त्यांचें मत आहे.

**ब्रह्मदेशाची तांदूळ निर्यात**—ब्रह्मदेशाची आतां तांदुळाची निर्यात वाढूं लागली आहे, परंतु १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत जितकी निर्यात झाली ती १९४९ च्या सहा महिन्यांतील निर्यातीपेक्षा ४०,००,००,००० पौंडांनीं कमी आहे. १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रह्मदेशानें १,३१,१०,००,००० पौंड तांदूळ निर्यात केला. १९४९ च्या ह्याच कालावधींत १,६९,९०,००,००० पौंड निर्यात करण्यांत आला.

**इंडोनेशिआला भारतीय व्यापारी मंडळ**—इंडोनेशिआशीं व्यापारी करार करण्यासाठीं भारतीय सरकार एक व्यापारी मंडळ पाठविणार आहे. भारतांतील साखरेची टंचाई लक्षांत घेता इंडोनेशिआंतून साखर आयात करण्याविषयीं हें मंडळ बोलणीं करील असा अंदाज आहे.

**हैद्राबादचा मॅटर्निटी ॲक्ट**—रेगे कमिटीच्या शिफारसीप्रमाणें मजुरांच्या बायकांना मातृपदप्राप्तीच्या वेळीं मिळणाऱ्या सवलतींत वाढ करण्यांत आली आहे. ह्या बाबतींत मिळणारा भत्ता आतां ७ आठवड्यांऐवजीं १२ आठवडे मिळणार आहे. ह्याच कालांतील मजुरी रोजीं ४ आणे वाढविण्यांत आली आहे.

**मद्रास बस सर्व्हिसला नफा**—मद्रास शहरांतील कॉर्पोरेशनच्या मालकीच्या बस सर्व्हिसला तोटा होत नसून ती फायद्यांत चालली असल्याचें मद्रास सरकारचे अर्थमंत्रि श्री. रेड्डी ह्यांनीं पत्रकारांच्या बैठकींत सांगितलें.

**काड्याच्या पेट्यांचा कारखाना**—हुबळी व धारवाड शहरांच्या दरम्यान आगपेट्यांचा एक कारखाना लवकरच निघणार आहे असें कळतें. हुबळी येथील एका कंपनीनें हा कारखाना काढण्याची परवानगी मुंबई सरकारकडून मिळविली आहे.

**सयामकडून तांदुळाची आयात**—भारताच्या अन्न खात्यानें सयामकडून ३०,००० टन तांदूळ आयात करण्याचें ठरविलें आहे. हा तांदळ बोटीवर चढविण्याची व्यवस्था करण्यासाठीं खात्याचा एक अधिकारी मुद्दाम सयामला धाडण्यांत आला आहे.

**वनस्पति-तुपाला विरोध**—गुजरात प्रां. काँग्रेस कमिटीच्या चिटणीसांनीं वनस्पति-तुपाच्या अनुकूल प्रचाराला आपला विरोध असल्याचें जाहीर केलें आहे. ह्या तुपांत 'अ' हें अन्नसत्व तर नसतेंच, परंतु तें खाल्ल्यानें माणसाची शक्ति वाढते असेंही नाहीं, असें त्यांनीं आपल्या पत्रकांत म्हटलें आहे. ह्या धंद्याला उत्तेजन न देतां लोकांनीं वनस्पति-तुपाचें उत्पादन बंद पाडण्याचे प्रयत्न करावेत अशी सूचना त्यांनीं केली आहे.

### ब्रिटॅनिया बिस्किट कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च १९५० अखेर संपलेल्या वर्षी ७९ लक्ष, ८१ हजार रुपयांची विक्री करून १६ लक्ष, ५ हजार रुपये ठोक नफा मिळविला. भागिदारांना १२½% डिव्हिडंड मिळालें. कंपनीचें वसूल भांडवल १३½ लक्ष रुपये असून रिझर्व फंड ४२ लक्ष रुपयांचा आहे.

### तीन राज्य सरकारांची कर्जे उभारणी

मद्रास, मुंबई व मध्यप्रदेश सरकारांनीं खालीलप्रमाणें कर्जे उभारण्यांच ठरविलें:—

मद्रास—४०० लक्ष रु. ३%. १९६०. किंमत ९९ रु. %
मुंबई— ३०० लक्ष रु ३% १९६०. किंमत ९९ रु. ८आ. %
मध्यप्रदेश-१०० लक्ष रु. ३% १९६०. किंमत ९८ रु. ८ आ. %

३१ जुलै ह्या एकाच दिवशीं अर्ज स्वीकारण्यांत आले, ते पुरेसे येऊन तीन्ही सरकारांना आवश्यक तेवढें कर्ज मिळालें.

### पुणें कॉर्पोरेशनचें कर्ज : मागणीच्या दुप्पट अर्ज

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशननें नुकतीच ४५,३२,९०० रुपयांच्या कर्जाची जनतेकडे मागणी केली होती. त्यापैकीं सरकारी हमीच्या ३० लाखांच्या कर्जासाठीं ६० लक्ष रुपयांच्या मागणीचे अर्ज आले, असें समजतें. १५ हजारांपर्यंतच्या अर्जदारांची सर्व मागणी पुरी करण्यांत येत आहे. १५ ते २५ हजारांच्या अर्जदारांस, मागणीच्या ७५% परंतु किमान १५ हजारांचे कर्जरोखे मिळतील. २५ हजारांवरील मागणीदारांस किमान २५ हजारांचे रोखे किंवा मागणीच्या ४६% कर्जरोखे मिळतील. विगर गॅरंटीचें १४,३२,९०० रुपयांचें कर्ज म्युनिसिपल कॉर्पोरेशनला हवें होतें; प्रत्यक्ष अर्ज सुमारें २० लाखांच्या मागणीचे आले.


—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ९ आगस्ट, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशी प्रवाशांचा पैसा हवा, तर त्यांच्या सोयी पाहिल्या पाहिजेत

परदेशी प्रवाशांना भारतांत आकर्षून त्यांना येथें पैसे खर्च करावयास लावण्याचें आर्थिक महत्त्व भारत सरकारास आतां पटलें आहे. येथील माल अमेरिकेकडे निर्गत करणें काय आणि अमेरिकन गिऱ्हाइकानें समक्ष येथें येऊन बरोबर आणलेले आपले पैसे खर्च करणें काय, दोन्हींची आर्थिक उपयुक्तता एकाच प्रकारची असते. अमेरिकन उतारू दुर्मिळ डॉलर येथें घेऊन येतील परंतु ते डॉलर त्यांच्या खिशांतून बाहेर कसे काढतां येतील, ह्या गोष्टीकडे सरकारनें लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. आपल्याला अमेरिकन पाहुण्यांविषयीं अगत्य वाटतें, तें त्यांच्या खिशांतील पैशामुळें. हे पैसे त्यांच्या पाकिटांतच राहिले, तर त्यांचा काय उपयोग ? परदेशी शास्त्रज्ञांची भारतास भेट व श्रीमंत परदेशी उतारूंची सफर, ह्यांत फार मोठें अंतर आहे. ह्या उतारूंनीं आणलेले पैसे येथें खर्चून टाकून, त्यांनीं आणखी पैसे अमेरिकेंतून मागवावे, इतकें भारताचें आकर्षण त्यांना वाटलें पाहिजे. हें आकर्षण केवळ रम्य स्थळें पाहून त्यांना वाटणार नाहीं. त्यांना हवी ती चैन करतां आली पाहिजे, त्यांना येथें पाहिजे तें सुख मिळालें पाहिजे, आणि त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीचें तें पाहिजे. परदेशी उतारूंच्या आवडीनिवडी सुप्रसिद्ध आहेत. तेव्हां त्याविषयीं अनास्था बाळगून त्यांच्यापासून प्राप्तीची मात्र अपेक्षा करणें चुकीचें होईल. परदेशी प्रवाशांना हवें तें द्या तरी, नाहींतर त्यांना बोलावू तरी नका. भारतांतील अनेक निर्बंधांमुळें परदेशी प्रवाशांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. खाणेंपिणें, करमणूक इत्यादि सर्वच बाबतींत त्यांना खेंचून आणण्याजोगी येथील परिस्थिती नाहीं. अगदीं जुन्या पद्धतीचे लोकहि, साहेब पाहुणा आला असतांना त्याला हवें तें खाण्यास व पिण्यास देत असत, सोवळेंओवळें तेवढ्यापुरतें बाजूस सारीत असत. अगदीं तीच पद्धत भारत व राज्य सरकारांनीं परदेशी पाहुण्यांच्या बाबतींत अंगीकारली पाहिजे. त्यामुळें थोडाफार अधःपात झाला, तरी त्या किंमतीच्या मोबदल्यांत मिळणारें दुर्मिळ चलन कितीतरी पटीनें मौल्यवान ठरणारें आहे. अमेरिकेंतून भारतांत येणाऱ्या उतारूंना परत येथें यावेसें वाटलें पाहिजे व त्यांनी परत गेल्यावर आपल्या भाऊबंदांना इकडे जाण्याची शिफारस केली पाहिजे. संन्यासी वृत्तीनें रहावयास त्यांना येथें लावलें, तर ते पाहुणे नियोजित वेळ संपण्यापूर्वीच हा देश सोडून परत जातील व येथें येऊं पहाणाऱ्या लोकांनाहि न जाण्याची सूचना देतील. ह्या प्रश्नाकडे धंदा या दृष्टीनें पाहिलें पाहिजे व एकदा हा धंदा करावयाचा म्हटलें म्हणजे, गिऱ्हाइकाची मर्जी संभाळलीच पाहिजे. सरकारचें धोरण ह्या बाबतींत अधिक उदार होण्यास किती तरी वाव आहे. अमेरिकेंतील किंवा युरोपांतील मनुष्यास मुंबईमधील जेवण पोटभर वाटणार नाहीं, दारूचा त्याला परवाना मिळाला तरी त्याच्या हिंदी मित्रांबरोबर किंवा उघडपणें त्याला ती घेता येणार नाहीं, आणि करमणुकीच्या बाबतींत इतर नियंत्रणें आहेत त्यांत ह्या अडचणींचीहि भर पडणार हें उघड आहे. परदेशी प्रवासी आकर्षण्याचा धंदा किफायतशीरपणें करावयाचा असेल, तर सरकारला कांहीं बाबतींतल्या आपल्या धोरणास मुरड घालावी लागणें अपरिहार्य आहे. ती तशी घालावयाची नसेल, तर परदेशी प्रवाशांच्या केवळ प्रवासाच्या सोईची जाहिरात करून कांहींहि फायदा होणार नाहीं. आपल्या लोकांची रहाणी निकृष्ट दर्जाची असली तरी तिचा परदेशी प्रवाशांवर प्रतिकूल परिणाम होऊं देता कामा नये. श्रीमंत पाहुण्यांच्या बाबतींत घरोघर जें धोरण आखण्यांत येतें, तेंच धोरण परदेशी प्रवाशांच्या बाबतींत व्यापक प्रमाणावर आणि संघटितपणें अंमलांत आणलें गेलें पाहिजे.

## ब्रिटनमधील ' चेंबर्स ऑफ कॉमर्स '

कोणत्याही देशाच्या औद्योगिक जीवनांत चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या व्यापारी संस्थांना महत्त्वाचें स्थान असतें. तथापि, अशा संस्थांचीं कार्यें आणि पसारा ह्यासंबंधी मात्र लोकांना नीटशी कल्पना असत नाहीं. असोसिएशन ऑफ ब्रिटिश चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या मध्यवर्ती संस्थेचे सेक्रेटरी जनरल मि. ऑर्थर नौल्स ह्यांनीं अशा प्रकारच्या संस्थांसंबंधीं कांहीं माहिती दिली आहे. त्यांच्या लेखांतील कांहीं भागाचा सारांश पुढें दिला आहे.

१५९९ मध्यें मार्सेल्समध्यें पहिल्या चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना झाली. इंग्लंडमध्यें पहिल्या चेंबरची स्थापना १७६८ सालीं झाली. त्यानंतर अशा संस्थांची वाढ होत जाऊन आज ब्रिटनमध्यें सुमारें १०० चेंबर्स आहेत. ' चेंबर ऑफ कॉमर्स ' ह्या नांवाला कायदेशीर स्थान नाहीं. ह्या संस्थांपैकीं पुष्कळशा संस्था किरकोळ व्यापाराशीं निगडित असल्यानें त्यांना ' चेंबर ऑफ कॉमर्स ' ही संज्ञा नीटशी लागू पडत नाहीं; ' चेंबर ऑफ ट्रेड ' हें नांव त्यांना अधिक शोभून दिसेल. ' चेंबर ऑफ कॉमर्स ' आपापल्या भागांतील व्यापार, उद्योग आणि वहातूक ह्यांचा विकास करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेली असते. एखाद्या धंद्यांतील वेतन अगर नोकरीच्या अटी इत्यादि बाबींत मात्र अशा संस्था लक्ष घालीत नाहींत. स्थानिक वहातूक व शिक्षण इत्यादि बाबतींत त्यांचें सहकार्य उपयुक्त ठरलेलें आहे. कांहीं चेंबर्स पोस्टल, टालिग्राफ व टेलिफोन ॲडव्हायजरी कमिट्या नेमतात, आणि त्यांच्या साह्यानें दळणवळणाच्या स्थानिक सवलती मिळवितात अगर चालू ठेवतात. मोठाल्या मध्यवर्ती संस्थांत निरनिराळे विभाग असतात. एखाद्या व्यापार अगर उद्योगविषयक प्रश्नासंबंधीं अधिकृत मत हे विभाग देऊं शकतात. पण स्वतः चेंबर ही संस्था मात्र समान हितसंबंधांची चर्चा करण्यासाठीं एक जागा येवढीच भूमिका घेते. ब्रिटनमधील निरनिराळ्या चेंबर्सच्या सभासदांची एकूण संख्या सुमारें ६०,००० असावी. ह्या सभासदांत सुमारें ३०,००० उद्योगपती आहेत. त्याशिवाय निर्यात करणारे व्यापारी, आणि वहातूक, बँकिंग, इन्शुरन्स इत्यादींचे प्रतिनिधी आहेत. सर्वांत मोठी ' चेंबर ' लंडनमध्यें आहे. ह्या चेंबरचे १५,००० सभासद असून २०० नौकर त्यांत काम कर-

तात. मँचेस्टरमधील चेंबरचे ५,००० सभासद आहेत, व नौकरवर्ग ४० आहे. जानेवारी १९४९ मध्यें १,००० च्या वर सभासद असलेली पुढील चेंबर्स होती.

| | | | |
|---|---|---|---|
| बर्मिंगहॅम | ४,१४६ | लिसेस्टर | १,२४६ |
| ब्रॅडफर्ड | १,२३८ | लिव्हरपूल | १,९८९ |
| ब्रिस्टल | १,०४५ | लंडन | १५,१८७ |
| एडिन्बरो | १,२२५ | मँचेस्टर | ५,१२४ |
| ग्लासगो | ३,४९७ | नॉटिंगहॅम | १,०५७ |
| लिड्स् | २,१८६ | शेफिल्ड | १,३६९ |

व्यापारी आणि उद्योगधंद्यांतील निरनिराळे वर्ग ह्या चेंबर्समधून संघटित झालेले असतात. प्रत्येकाला आपलें उत्पन्न मिळविण्याचें आणि धोरण ठरविण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य असतें. आधुनिक उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या वाढत्या व्यापाबरोबर 'चेंबर्स ऑफ कामर्स' ह्या संस्थांचें कार्यक्षेत्रही वाढत जाईल ह्यांत शंका नाहीं.

## भारतांत मोटारींचें उत्पादन

भारतीय सरकारनें मोटारींच्या धंद्याबद्दल आपलें धोरण नुकतेंच निश्चित केलें आहे ह्या धोरणांत पुढील बाबींचा प्रामुख्यानें समावेश होतो. संपूर्ण मोटारींची आयात बंद करणें, भारतांत जास्तीत जास्त किती मोटारींचें उत्पादन व्हावें त्याची संख्या ठरविणें, मोटारींच्या सुट्या भागांच्या उत्पादनाला परदेशी मालाच्या स्पर्धेविरुद्ध संरक्षण देणें; आणि १९५६ सालच्या सुमाराला पूर्णपणें भारतीय बनावटीच्या मोटारी तयार करणें. असें असलें तरी, आज भारत मोटारींच्या उत्पादनांत किती मागासलेला आहे हें पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल. एक मोटार किती माणसांना वापरावी लागते अगर लागेल ह्यांचें निरनिराळ्या देशांचें प्रमाण पुढें दिलें आहे.

| देश | माणसें |
|---|---|
| अमेरिका | ४.९ |
| इंग्लंड | २४.६ |
| जर्मनी | ६८ |
| फ्रान्स | २२ |
| कॅनडा | ९ |
| इटली | ११२ |
| राशिआ | ९२१ |
| झेकोस्लोव्हाकिआ | १२६ |
| भारत | १४२६ |

भारतांत संपूर्ण मोटारी बनविण्याचें आतां ठरविण्यांत आलें असल्यानें ह्या बाबतींत खरीखुरी प्रगति होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

खाली दिलेल्या कोष्टकांत प्रत्येक मोटारीमागें लागणाऱ्या मालाचे आंकडे दिले आहेत.

| माल | पौंड वजन | एकूण मालांत टक्केवारीचें प्रमाण |
|---|---|---|
| पोलाद | १,८०० | ५४.२९ |
| लोखंड | ६०० | २१.४३ |
| रबर | ११० | ३.९३ |
| कापडी सामान | ७० | २.५० |
| कांच | ६५ | २.३२ |
| पितळ | २८ | १.०० |
| शिसें | २५ | ०.८९ |
| लाकूड | २० | ०.७१ |
| शुद्ध तांबें | १८ | ०.६४ |
| लोकर | ५ | ०.१८ |
| इतर | ५९ | २.११ |
| मोटारींचें एकूण वजन | २,८०० | १००.०० |

ह्या कोष्टकावरून हें लक्षांत येईल कीं, मोटारीला लागणाऱ्या मालापैकीं ८६ टक्के पोलाद व लोखंड लागतें. भारतांत लोखंड व पोलादाला जितकी मागणी आहे त्या मानानें उत्पादन नाहीं. ह्या दोन धातूंचें उत्पादन वाढविण्यासाठी दरवर्षी ५,००,००० टन उत्पादन करूं शकणारे दोन कारखाने काढण्याचा सरकारचा विचार आहे. हे दोन कारखाने शक्य तितक्या लवकर काढून त्यांचें उत्पादन १,००,००० टन वाढवावें लागेल. मोटारीला लागणारा इतर माल देशांत भरपूर असल्यानें त्याबाबत कांहीं अडचण नाहीं.

आतांपर्यंत भारत आपली मोटारींची गरज मोटारी आयात करून भागवीत असे. १९३७–३८ ते १९४७–४८ पर्यंतचे आयातीचे आंकडे पुढील प्रमाणे आहेत.

| वर्ष | खाजगी मोटारी | मालवाहू ट्रक्स् | एकूण |
|---|---|---|---|
| १९३७-३८ | १५,७७७ | १४,७७१ | ३७,५४८ |
| १९३८-३९ | १०,९८८ | ७,७३३ | १८,०२१ |
| १९३९ ४० | ९,९६५ | १४,४६१ | २४,४२६ |
| १९४०-४६ | | नक्की आंकडे मिळत नाहींत. | |
| १९४६-४७ | १०,६८३ | ८,६५४ | १९,३३७ |
| १९४७-४८ | २१,७५९ | १३,६५५ | ३५,४१४ |

ह्या सर्व आयातीची सरासरी किंमत दरवर्षी १८ कोटी रुपये होते. युद्धोत्तर कालांतील मोटारींची वाढती मागणा लक्षांत घेता खाजगी मोटारी व मालवाहू मिळून दरवर्षी १,००,००० गाड्यांची आयात करावी लागते असा अंदाज करण्यांत फारशी चूक होणार नाहीं.

आतां मोटारी जुळविणारे अगर तयार करणारे कारखाने किती आहेत तें पाहू. १९४७ सालीं मोटारी जुळविणारे फक्त ७ कारखाने भारतांत होते. ह्या सर्व कारखान्यांनीं मिळून १९४७ सालीं १०,४३३ खाजगी मोटारी आणि ९,४१८ मालवाहू मोटारी जुळविल्या. आतां मोटारी जुळविणारे १३ कारखाने झाले आहेत परंतु त्यापैकीं हिंदुस्थान मोटार्स लि. कलकत्ता आणि प्रिमिअर ऑटोमोबाइल्स मुंबई ह्या दोनच कंपन्या निर्देश करण्यासारख्या आहेत. पांच वर्षांत म्हणजे १९५४ साल अखेर हिंदुस्थान मोटार्सनें २०,००० मोटारी तयार करण्याचें ठरविलें आहे. प्रीमिअर ऑटोमोबाइल्स कंपनी ही पांच वर्षांत ५,००० मोटारी आणि १०,००० मालवाहू गाड्या तयार करणार आहे. ह्या दोन कंपन्यांशिवाय पुढील कंपन्या कारखाने काढणार आहेत.

अशोक मोटार्स लि. मद्रास; स्टँडर्ड मोटार प्रॉडक्टस् ऑफ इंडिया लि. मद्रास; जनरल मोटार्स लि. मुंबई; फोर्ड मोटार्स लि. कलकत्ता, मुंबई व मद्रास; मोटार हौस (गुजरात) लि. मुंबई; पेनिन्शुलर मोटार कॉर्पोरेशन लि. कलकत्ता आणि मुंबई; फ्रच मोटार कार कं. लि. कलकत्ता व मुंबई; देवार्स गॅरेज अँड एंजिनिअरिंग वर्क्स, कलकत्ता; महींद्र आणि महींद्र लि. मुंबई; ट्रॅंग्युलर मोटार्स लि. मुंबई आणि युनियन कं. (मोटर्स) लि. मद्रास.

हिंदुस्थान मोटार्स आणि प्रीमिअर ऑटोमोबाइल्स ह्या दोन कंपन्या भारताची मोटारीची गरज पूर्णपणें भागवूं शकणार नाहींत. अर्थातच त्या कंपन्यांपेक्षांही अधिक स्वयंपूर्ण अशा कांहीं कारखान्यांची जरूर आहे. असे नवीन कारखाने निघाले तर त्यांतून दरवर्षी कमीतकमी १०,००० खाजगी मोटारी आणि ५,००० मालवाहू मोटारी तयार झाल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या एका कारखान्याला किती भांडवल लागेल त्याची कल्पना सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं दिली आहे. मोटारींचे नवीन कारखाने शक्यतोंवर मुंबईला निघावेत, अशीच ह्या धंद्याची स्वाभाविक परिस्थिति आहे.

## सहकारी चळवळीची सर्वांगीण प्रगति

( भारतामध्येंल सहकारी चळवळीची प्रगति वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या प्रकारानें कशी झाली आहे, हें खालील १९४७–४८ च्या तपशिलावरून लक्षांत येईल संयुक्त प्रांतांत सोसायट्यांची संख्या सर्वांत ज्यास्त असली, तरी त्यांचें खेळतें भांडवल फार कमी आहे, पूर्व पंजाबांत ७० मध्यवर्ती बँका तर मुंबईत फक्त १५, इत्यादि माहिती उद्बोधक वाटेल. सहकारी चळवळ स्वावलंबी होण्यास किती वाव आहे, हेंहि स्पष्ट होईल. )

१९४७–४८ अखेर भारतांत १,४९,७६८ सहकारी सोसायट्या होत्या. त्यापैकीं ९९,२६१ संयुक्त प्रांतांत, १९,०४४ हैद्राबादमध्यें, १८,६५६ मद्रासमध्यें होत्या. प्राथमिक सोसायट्यांच्या १ कोटी, १ लक्ष समासदांपैकीं २५ लक्ष मद्रासमध्यें, १५ लक्ष हैद्राबादमध्यें व १४ लक्ष मुंबई प्रांतांत होते. संयुक्त प्रांतांत ११½ लक्ष सभासद होते.

सर्व सोसायट्यांचें एकूण खेळतें भांडवल १७१ कोटी रुपये भरलें. १९४६–४७ अखेर तें १५६ कोटी रुपये भरलें होतें. त्यांत वसूल भांडवल २६ कोटी ८५ लक्ष रुपये, कर्जे व ठेवी ११२ कोटी ५८ लक्ष रुपये, १३ कोटी ८० लक्ष रुपये रिझर्व्ह फंड, असा तपशील आहे. मद्रास प्रांत सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलाचे बाबतींत अग्रेसर ( ५६ कोटी, ५४ लक्ष रु. ) आहे. मुंबईचा अनुक्रम दुसरा ( ४४ कोटी, २२ लक्ष रु. ) येतो. संयुक्त प्रांतांत सर्वांत जास्त सोसायट्या असल्या, तरी त्यांचें खेळतें भांडवल फक्त ६ कोटी, ८९ लक्ष रु. होतें. भारतांतील एकूण सोसायट्यांपैकीं २०% सोसायट्या असलेल्या ह्या प्रांतांतील खेळतें भांडवल एकूण भारतांतील खेळत्या भांडवलाच्या ४% सुद्धां नाहीं. सहकारी सोसायट्यांच्या एकूण १७१ कोटी रुपये खेळत्या भांडवलापैकीं ५० कोटी रुपये म्हणजे ३०% भांडवल बिगर–सभासदांचें आहे ह्यावरून, सहकारी चळवळीच्या स्वावलंबनास अद्याप किती वाव आहे हें स्पष्ट होईल.

१९४७-४८ मध्यें भारतांत एकूण ११ प्रांतिक बँका व ४६९ सेंट्रल बँका काम करीत होत्या. पूर्व पंजाब खेरीज बाकी सर्व प्रांतांत प्रांतिक बँका होत्या. मध्यवर्ती बँकांच्या संख्येच्या दृष्टीनें पूर्व पंजाब ( ७० ), संयुक्त प्रांत ( ६६ ), हैद्राबाद ( ४६ ), बिहार ( ४३ ), मद्रास ( ३० ) व मुंबई ( १५ ) असा अनुक्रम लागतो. प्रांतिक बँकांचें एकूण वसूल भांडवल ८९ लक्ष रु. असून रिझर्व्ह फंड ८१ लक्ष रुपये होता. कर्जे व ठेवी ह्यांच्या रूपानें त्यांचेकडे ९१½ कोटी रुपये जमा होते. फक्त एका प्रांतिक बँकेस तोटा आला. सं. प्रांताच्या प्रां. बँकेनें ३३,५०२ रु. तोटा दाखविला. सर्वांचा एकूण नफा १७ लक्ष रुपये भरला. मद्रास प्रांतिक बँकेनें सर्वांत अधिक ( ९% ) डिव्हिडंड वाटलें.

सेंट्रल बँकांचें एकूण वसूल भांडवल २ कोटी ८३ लक्ष रुपये, एकूण रिझर्व्ह फंड १ कोटी ९४ लक्ष रुपये, ठेवी व कर्जे ३५ कोटी २० लक्ष रुपये, नफा ३९ लक्ष ८४ हजार रुपये, असा तपशील आहे. भागीदारांना २% ते १०% डिव्हिडंड मिळालें.

१,२५,९०७ शेतकी सोसायट्यांचें वसूल भांडवल ८ कोटी रुपये होतें व रिझर्व्ह फंड ६३ कोटी रुपये होता. त्यांना खेळत्या भांडवलासाठी प्रांतिक व सेंट्रल बँका ह्यांवरच मुख्यतः अवलंबून रहावें लागलें. अशा रीतीनें त्यांनीं १३ कोटी रुपयांची कर्जे घेतलीं होतीं. एकूण नफा १ कोटी, १५ लक्ष रु. झाला. त्यांनीं स्वतः १ ते १२½% दरानें कर्जे घेतलीं व ½% ते २५% दरानें कर्जे दिलीं. बिहारमधील दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर ६¼% ते २५% होता.

लँड मॉर्टगेज बँका व सोसायट्या ह्यांच्या २७७ संख्येपैकीं फक्त ५ सेंट्रल बँका होत्या. सेंट्रल बँकांचें एकूण खेळतें भांडवल ५ कोटी, २२ लक्ष रुपये होतें. १९४७–४८ मध्यें त्यांनीं ७८ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. त्यांचें एकूण येणें ३ कोटी, ८५ लक्ष रुपये होतें. त्यांना नफा ३ लक्ष ५ हजार रु. झाला. प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांनीं ९१ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलीं. त्यांचीं येणें कर्जे ४ कोटी ७ लक्ष रुपयांचीं होतीं.

२२,९२० सोसायट्या, ३६ लक्ष सभासद, ६१ कोटी रुपये खेळतें भांडवल, १४½ कोटीचें वसूल भांडवल, कर्जे व ठेवी ११७ कोटी रुपये, सभासदांना ७९ कोटी रुपयांची विक्री, समासदांच्या मालाची ५३ कोटींची खरेदी, व्यवस्था खर्च ३ कोटी १९ लक्ष रुपये, एकूण नफा २ कोटी रुपये, असा बिगर शेतकी सोसायट्यांच्या व्यवहाराचा तपशील आहे. १९४६–४७ च्या मानानें त्यांचा नफा १९४७–४८ मध्यें ६१ लाखांनी घटलेला आढळतो.

## किर्लोस्कर मासिकाच्या यशाचें रहस्य

" किर्लोस्कर " मासिकाला १ ऑगस्ट, १९५० रोजीं ३० वर्षे पुरीं झालीं व त्यानें ३१ व्या वर्षात पदार्पण केलें. ह्या महत्त्वाच्या प्रसंगीं आम्ही त्याचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. १९२० सालीं " किर्लोस्कर खबर " चा जन्म झाला, तेव्हांपासूनची त्याची प्रगति ज्यांनीं पाहिली आहे त्यांना "किर्लोस्करा" नें महाराष्ट्रीयांच्या विचारांस नवें वळण लावून त्यांना कार्यप्रवण करण्याचे कामीं कशी कामगिरी बजावली आहे, ह्याची सहज कल्पना येईल. "किर्लोस्कर" मासिकाचे यशस्वी संस्थापक व संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांनीं तरुणांत उद्योगवृत्ति निर्माण करण्यासाठी केवळ लिखाणानें मासिकाच्याच द्वारा नव्हे तर प्रत्यक्ष कृतीनें आपलें आयुष्य खर्च केलें आहे. " किर्लोस्करां"तील तेजस्वी व मार्गदर्शक लिखाणास किर्लोस्कर घराण्याच्या औद्योगिक कामगिरीची पार्श्वभूमि असल्याकारणानें तें अधिकच शोभून दिसतें व लोकांना पटतें. किर्लोस्करांनीं आपल्या कारखान्याचे द्वारा औद्योगिक उत्पादनाचे बाबतींत जशी मोठी कामगिरी बजावली आहे तशीच अप्रत्यक्ष कामगिरी जनतेस उद्यमप्रवण करून किर्लोस्कर मासिकानें केली आहे; आणि ती मोजता येण्याजोगी नाहीं. महाराष्ट्रांतील विद्वान लेखकवर्ग " किर्लोस्करां "त लेख येण्यांत भूषण मानतो, जाहिरातदार आपल्या कार्यक्रमांत " किर्लोस्करा"स वगळूं शकत नाहींत आणि मागाहून अनेक मासिकें निघालीं तरी तुलना करण्यासाठी त्या सर्वांना " किर्लोस्कर " चाच आदर्श ठेवावा लागतो. सर्व मराठी मासिकांत " किर्लोस्कर"चा खप अधिक आहे आणि तो त्याच्या निवळ गुणानें आहे; फालतू आकर्षणामुळें नाहीं. " किर्लोस्कर "च्या ह्या निर्मळ यशाचें मुख्य श्रेय त्याचे संस्थापक, संपादक व सूत्रचालक श्री. शंकरराव ह्यांस आहे. अशा आदर्श मासिकाच्या ह्या वाढदिवसाचे निमित्तानें आम्हीं त्यांना आणि त्यांच्या " किर्लोस्करा"स व इतर मासिकांसहि अशीच भरभराट चिंतितो, आणि गेलीं कांहीं वर्षे " किर्लोस्करा"ची परंपरा चालविणारे कार्यकारी संपादक श्री. मुकुंदराव शं. किर्लोस्कर ह्यांस मुख्य संपादकाचे नव्या जबाबदारीचे जागीं सुयश इच्छितो.

## खातेदाराचें पासबुक किंवा स्टेटमेंट

### किचकट परंतु अत्यंत जबाबदारीचें काम

खातेदाराचें पासबुक किंवा स्टेटमेंट ऑफ अकौंट भरून देण्याचें काम मोठें कंटाळवाणें असतें. परंतु त्यांत चूक झाली, तर बँकेस नुकसानी येण्याचा संभव असतो. समजा क्ष बँकेचे जोगळेकर व जोगईकर असे दोन खातेदार आहेत. जोगईकरानें आपल्या खात्यांत १०० रु. चा चेक भरला. परंतु लेजर कारकुनानें चुकून जोगळेकराचे खात्यास क्रेडिट दिलें. पास बुक कारकुनानें ही चूक कायम ठेवून, त्याच्या पासबुकांतील शिल्लक रकम १०० रु. नीं वाढविली. जोगळेकर ह्याला व्यापाराची कांहीं माहिती नाहीं. स्वतःचा तो हिशेब लिहीत नाहीं किंवा बँकेचा बॅलन्स तपासून पहात नाहीं. पासबुक हातीं आल्यावर त्याच्या आधारावर तो ही १०० रु. जादा शिल्लक काढून घेऊन, बँकेस चूक कळण्यापूर्वीच खर्च करून टाकतो. क्ष बँकेस हे १०० रुपये वसूल करता येणार नाहींत आणि तिला तें नुकसान सोसावें लागेल. पासबुकांतील एन्ट्रीज तपासून पहाण्याचें खातेदारावर बंधन नसतें. अर्थात्, त्यानें शुद्ध मनानें आचरण केल्यास पासबुकावर त्यानें विसंबून रहाण्यांत वावगें कांहींच नाहीं. त्याचप्रमाणें, जोगळेकरानें पासबुकाप्रमाणें खात्यांत पुरेसे पैसे आहेत म्हणून चेक दिले असतील आणि चूक आढळल्यानंतर चेक बँकेकडे दाखल होऊन परत करण्यांत आले तर बँकेनें त्याला नुकसानभरपाई (डॅमेजेस) दिली पाहिजे.

अशा रीतीनें, बँकेच्या दृष्टीनें पासबुकाबाबत परिस्थिति असमाधानकारक असते. बँकर आणि खातेदार ह्यांचेमधील देवघेवीचें पासबुक हें निर्णायक रेकॉर्ड असतें. खातेदारानें तक्रार केली नाहीं म्हणजे पासबुकांतील एन्ट्रीज अखेरच्या बंधनकारक होतात असें मात्र नाहीं. एन्ट्रीजच्या अचुकपणावर खातेदार विसंबून राहिला, तरी तो केव्हांहि डेबिट बाबींविषयीं तक्रार करूं शकतो. खातेदारास अनेक वेळा पासबुक भरून दिलें होतें आणि प्रत्येक वेळेस त्यानें तें पुनः भरण्यासाठी बिनतक्रार बँकेकडे पाठविलें होतें, असें बँकेनें म्हणून भागणार नाहीं. खातेदारानें एन्ट्रीज तपासून पहाण्याचें कारण नाहीं, हें निर्विवाद आहे. तेव्हां, बँकेकडे अनेकवार चेकबुक धाडलें म्हणून त्याच्या अचुकपणास खातेदाराची मान्यता आहे असा अर्थ होत नाहीं. तथापि, वरचेवर पासबुकें भरून दिलीं तर बहुतेक खातेदार शिल्लक तपासून पहातात व ज्या डेबिट बाबी त्यांस मान्य नसतील, त्या बँकेच्या निदर्शनास आणतात. खातेदारानें सरळ मनानें वागून पासबुकांतील शिलकीवर विसंबून ते पैसे काढण्यापूर्वी बँक कांहीं बदल करूं शकली नाहीं, तर पासबुकांतील क्रेडिट एन्ट्रीज कायद्याप्रमाणें निर्णायक समजल्या जातील. उलटपक्षीं, डेबिट एन्ट्रीज ह्या निर्णायक कधींच होत नाहींत. खातेदाराच्या खात्याला त्याच्या हुकुमाविना डेबिट पडलेली रकम तो बँकेकडून केव्हांहि वसूल करूं शकतो. एन्ट्री करून फार काळ लोटला असला आणि त्यानंतर अनेकवेळा बँकेकडून त्यानें पासबुक भरून घेतलें असलें तरी खातेदारास ही एन्ट्री अमान्य करतां येते. बनावट चेक्सची बँकेनें रकम दिलेली असेल आणि खातेदारानें त्यानंतर पासबुक तपासून बँकेकडे, बनावट चेक्सबद्दल कांहींहि न म्हणतां तें परत धाडलें असलें तरी ही दिली गेलेली रकम बँकेकडून मागाहून तो वसूल करून घेऊं शकतो.

एका मिलिटरी खातेदाराचे खात्यांत चुकून रकमा क्रेडिट केल्या गेल्या. पांच वर्षेपर्यंत ही चूक चालू राहिली. त्याच्याकडे पाठविण्यांत येत असलेल्या स्टेटमेंट ऑफ अकाउंटमध्यें दाखविलेल्या शिलकांच्या आधारें खातेदार ते पैसे काढत गेला. पुढें बँकेला तिची चूक आढळून आली आणि इतर मार्गांनीं बँकेकडे खातेदाराची जी रकम जमा झाली ती स्वतःकडे घेऊन नुकसान भरवून काढण्याचा बँकेनें प्रयत्न केला. परंतु, बँकेला तसें करतां येणार नाहीं असा कोर्टानें हुकूम दिला. बँकेनें केलेल्या चुकीमुळें खातेदाराचे पासबुकांत जास्त शिल्लक लिहिली गेली आणि त्या शिलकेच्या आधारावर खातेदारानें पैसे काढण्यापूर्वी बँकेच्या नजरेस चूक आली नाहीं तर ही क्रेडिट एन्ट्री बँकेवर बंधनकारक राहाते. अर्थात्, खातेदारास जाणूनबुजून अशा चुकीच्या एन्ट्रीचा फायदा घेता येणार नाहीं. ही एन्ट्री आपल्या खात्याची नाहीं ह्याची खातेदारास दखल असली तर तो पैसे काढून घेऊन, बँकेनें माझी दिशाभूल केली असें परत म्हणूं शकणार नाहीं. खातेदार हा व्यापारी असेल, तर तो नीट हिशेब ठेवतो व त्याला त्याच्या बँकेंतील खात्यांतील शिलकेची दैनंदिन माहिती असते असें गृहीत धरलें जाईल आणि त्याच्या खात्यांत जमा केलेल्या जादा रकमा बँक वसूल करून घेऊ शकेल. खातेदारानें पासबुक किंवा स्टेटमेंट पाहिलेंच नसेल तर त्यांतील एन्ट्रीमुळें दिशाभूल झाली असें त्यास म्हणता येणार नाहीं. खातेदाराला ह्या एन्ट्री कळविलेल्या नसतील तर बँक जबाबदार रहाणार नाहीं. खातेदारानें पासबुकांतील एन्ट्री पाहिली असली पाहिजे.

पासबुक किंवा स्टेटमेंट ऑफ अकाउंट ह्यांतील नोंद तपासून पहाण्याचें आणि, ह्या नोंदी बरोबर असल्याचें मान्य करण्याचें बंधन खातेदारावर आहे काय? त्यानें बँकेच्या निदर्शनास चुका आणल्या नाहींत, तर त्यामुळें त्याचें कांहीं नुकसान होतें काय? नाहीं, असें त्याचेवर बंधन नाहीं. चुकीनें टाकलेल्या डेबिट रकमा तो केव्हांहि नाकारूं शकतो. ह्या दृष्टीनें पासबुकाचा किंवा स्टेटमेंटचा बँकेस कायदेशीर फायदा कांहींहि नाहीं. एका प्रकरणांत एका खातेदाराच्या खात्यास बनावट चेक्स डेबिट टाकले होते. खातेदारानें पास बुकांत प्रत्येक नोंदीवर 'टीक' केली होती. अशा रीतीनें नोंदी बरोबर असल्याची त्याची मान्यता होती. त्याच्या त्या स्तब्धतेमुळें आणखी पुढील बनावट चेक्सची रकम देण्यास बँक उद्युक्त झाली. "पासबुक तपासून पहाणें खातेदाराचें काम नाहीं, पासबुकाची दिलेल्या चेक्सशीं रुजवात त्यानें घातलीच पाहिजे असें नाहीं. नोंदीवर 'टिका' केल्या, एवढ्यानें त्यांच्या अचुकपणास खातेदाराची मान्यता मिळत नाहीं" असा कायद्याचा निवाडा झाला. ज्यानें चेक बनावट लिहिले, त्यानेंच पासबुकांतील नोंदीवर 'टीका' केल्या नसतील कशावरून आणि त्यामुळें लवाडी उघडकीस येणें अशक्य झालें नाहीं कशावरून?

जेथें मोठ्या प्रमाणावर कामधंदा चालतो, तेथें बँकेंतील खातें चालविणें व तें तपासणें हीं कामें नोकरांकडे सोपवावीं लागतात. ज्याच्याकडे नोंदी तपासण्याचें काम, त्यानेंच फसवणुकीस मदत करणें अगदी शक्य असतें. कंपनीच्या सेक्रेटरीनें अशा रीतीनें पास बुकांतील नोंदीवर 'टीका' केल्यानें, कंपनीवर त्याची जबाबदारी येत नाहीं. बनावट चेक्सच्या बाबतींत, बनावट चेकचे पैसे देणें हाच बँकेचा निष्काळजीपणा ठरतो, आणि फोर्जरी करणारा इसम मालकापासून पासबुकांतील पुरावा लपवूं शकतो. थोडक्यांत म्हणजे, पासबुकें लिहून काढण्याचें काम किचकट वाटलें तरी तें फार जबाबदारीचें असतें.

### अलिपूरची नवी टांकसाळ

अलिपूर ( कलकत्ता ) येथील टांकसाळीचें बांधकाम पुरें झालें, म्हणजे तेथील स्ट्रँड रोडवरील १२१ वर्षांची जुनी टांकसाळ बंद होईल. मुंबईमधील टांकसाळहि १२१ वर्षे चालू आहे. तिच्यामध्यें दररोज १० लक्ष नाणीं पाडतां येतात. अलिपूरच्या नव्या टांकसाळीची उत्पादनक्षमता १२ लक्ष नाण्यांची होईल. ह्या टांकसाळीच्या उभारणीस १ कोटी, ३० लक्ष रुपये खर्च येईल.

### शेतकीविषयक हिंदी शब्द

शेती व्यवसायांत वापरण्यांत येणाऱ्या इंग्रजी शब्दांचें हिंदीमध्यें भाषांतर करण्यासाठीं भारत सरकारनें कृषि मंत्री श्री. मुनशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. समितींत २० सभासद आहेत.

### भांडवल उभारणीवरील निर्बंध

नव्या लिमिटेड कंपन्यांची उभारणी आतां मंदावली असल्याकारणानें, भांडवल उभारणीवरील निर्बंधांची आवश्यकता उरलेली नाहीं. त्यामुळें हे निर्बंध लवकरच रद्द होतील, अशी अपेक्षा आहे.

### झंडू फार्मास्युटिकल वर्क्स लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९५० अखेर संपलेल्या वर्षी १,८०,५६६ रु. नफा झाला. त्यापूर्वीच्या वर्षीचा नफा २,१२,४१४ रु. होता. डिव्हिडंडचा ६% दर कायम राखण्यांत आला आहे.

### ४० हिन्दी यंत्रज्ञांची विलायतची वारी

कॉव्हेन्ट्री ( ग्रेट ब्रिटन ) येथील हॅरी फर्ग्युसनच्या ट्रॅक्टरच्या कारखान्यांत ट्रॅक्टर विषयक अभ्यास करण्यासाठीं ४० हिंदी यंत्रज्ञ सोमवार ता. २४ रोजीं एका खास विमानानें रवाना झाले. ट्रॅक्टरचें उत्पादन कसें करतात, हें समक्ष पाहून त्यांच्या दुरुस्तीचेंहि शिक्षण ते घेतील. इंग्लंडमधील यांत्रिक पद्धतीची शेतीहि त्यांस दाखविण्यांत येईल. हॅरी फर्ग्युसन ऑफ इंडिया लि. च्या मद्रास येथील कारखान्यांत १ सप्टेंबर रोजीं ट्रॅक्टर्सचें उत्पादन सुरू होईल.

### बँकिंग आणि शेतकरी

वरील नांवाची एक उपयुक्त व मनोरंजक फिल्म लंडनच्या बँकिंग इन्फर्मेशन सर्व्हिसनें तयार केली आहे. प्रगतिप्रिय शेतकऱ्यांची अल्पकालीन कर्जाची गरज बँका कशा भागवूं शकतात, हें फिल्ममध्यें उद्बोधक रीतीनें दाखविण्यांत आलें आहे. फिल्म १८ मिनिटें चालते. बँकेच्या स्थानिक शाखेच्या मॅनेजरच्या कामाची जबाबदारी कशी मोठी असते, हेंहि फिल्ममध्यें पहावयास मिळतें.

### लंडन आणि न्यूयॉर्क

जगांतील सर्वांत मोठें शहर असण्याचा लंडनचा मान अद्याप टिकून आहे. लंडनची लोकसंख्या ८३,४९,९४० आहे. त्याचे खालोखाल न्यूयॉर्क शहराचा अनुक्रम लागतो. न्यूयॉर्कची लोकसंख्या ७८,४१,६१० आहे.

### पदवीधरांवर रिक्षा ओढण्याची पाळी!

आग्रा येथें दोन सुशिक्षित तरुण रिक्षा ओढूं लागले आहेत. त्यांपैकीं एक बी. ए. असून दुसरा मॅट्रिक झालेला आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )
श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

